पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ६९

सभावृत्तांत

दिनांक - १६/०७/२०१३ वेळ - दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १६/०७/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.जगदीश शेट्टी
८) मा.भालेकर अरुणा दिलीप
९) मा.वाघेरे सुनिता राजेश
१०) मा.महेशदादा किसन लांडगे
११) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१२) मा.लोंढे गणेश नारायण
१३) मा.कदम सदगुरु महादेव
१४) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
१५) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी – आयुक्त, मा.तानाजी शिंदे -अति.आयुक्त, मा.झुरे –सह आयुक्त, मा.गायकवाड, मा.कारचे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे,मा.टेकाळे, मा.दुरगुडे,मा.माछरे,मा.फुंदे - सहा. आयुक्त, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक,मा.गावडे – नगरसचिव,मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे –विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.पाटील,मा.तुपे – सह शहर अभियंता, मा.भोसले – मुख्यलेखापाल,मा.डॉ.मनोज देशमुख – प्र.आरोग्य वैद्यकिय अधिक्षक, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी,मा.भदाणे – उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.ढगे, मा.निकम,मा.चव्हाण, मा.काची, मा.रामदास जाधव,मा.शरद जाधव, मा.थोरात, मा.साळवी,मा.लडकत,मा.खाबडे,मा.दांगट, मा.चिंचवडे, मा.सय्यद,मा.बरशेट्टी - कार्यकारी अभियंता, मा.कांबळे – प्र शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.पोमण – संगणक अधिकारी,मा.पाटील – प्राचार्य आयटीआय मोरवाडी, मा.पवार – प्र.कायदा सल्लागार,प्रविण अष्टेकर – जाईंट एमडी पी एम पी एम एल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>**

विषय क्रमांक - ३५) दुरसंचार विभागाचे नियंत्रणाखालील हेल्पलाईन नुतनीकरणाचे काम करणेबाबत..

विषय क्रमांक - ३६) स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी आलेल्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक - ३७) सर्पदंश उपचाराकरिता आवश्यक लागणारे **Inj.asv (10ml)** खरेदीबाबत..

विषय क्रमांक - ३८) नि.नो.क्र.१२/४-२००७-२००८ या कामाच्या खर्चास निविदा अटी शर्तीनुसार व निविदा पुर्व सभेनुसार भाववाढीस मंजुरी देणेबाबत..मा.अरुणा भालेकर, मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक - ३९) १० कलमी कार्यक्रमांतर्गत फोर कलर पुस्तीका छपाई करणेबाबत..

----------

अ) दिनांक २/७/२०१३ व ९/७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक-६७) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक ९/७/२०१३ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक-६८) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक – ३६८१ विषय क्रमांक – १
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – विद्युत
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.सदगुरु कदम
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/३६०/२०१३दि.२४/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.४/१२-१३ मधील अ.क्र.२ अन्वये, सन २०१२-१३ मध्ये मनपाच्या अ प्रभाग कार्यक्षेत्रातील उद्यानात आवश्यकतेनुसार नवीन पंप बसविणे व उद्यानातील पंपाची / बोअरवेलची देखभाल व दुरुस्ती करणेकामी मे.ओंकार इंजिनिअरींग (नि.र.रू.३२,५६,४०२/- *[र.रू.बत्तीस लाख छपन्न हजार चारशे दोन]* पेक्षा १९.९९ **%** कमी) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------------

ठराव क्रमांक – ३६८२ विषय क्रमांक – २
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – जलनि:सारण
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/२/कावि/५३७/२०१३दि.२५/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.५/२०१२-१३ मधील अ.क्र.११ अन्वये, भाटनगर येथे मैला सांडपाण्यासाठी संप व पंप हाऊस बांधणे व पंपिंग मशिनरी पुरविणेकामी मे.दिपक आपटे अँण्ड असोसिएट्स (नि.र.रू.६०,४५,६५४/- (र.रू.साठ लाख पंचेचाळीस हजार सहाशे चोपन्न) पेक्षा ३६.५० **%** जास्त) या ठेकेदाराकडून करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६८३ विषय क्रमांक – ३

दिनांक – १६/७/२०१३ विभाग – स्थापत्य

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/८/कावि/१३४/२०१३दि.२८/६/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२९/२०१२-१३ मधील अ.क्र.५ अन्वये, चिखली म्हेत्रेवाडी सें.क्र. २० मोकळा प्लॉट क्र. ३० येथिल गजानन म्हेत्रे उदयान विकसित करणेकामी मे.सुरज कॉन्ट्रक्टर ( नि. र.रु.३७,२०,५५९/- (अक्षरी र.रु.सदतीस लाख वीस हजार पाचशे एकोणसाठ ) पेक्षा २२.०८ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.३०,४४,०१३/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६८४ विषय क्रमांक – ४

दिनांक – १६/७/२०१३ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार (वैद्यकिय)

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/५/कावि/४०९/२०१३दि.१/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

मनपाच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाच्या इमारतीमधील कॉरीडॉर (कॉरीडॉर, इनडोअर, संडास, बाथरूम, मुता-या ) अंतर्गत व बाह्य परिसराची दैनंदिन साफसफाई व स्वच्छता करणेकामी सध्या काम करीत असलेल्या मे.बी.व्ही.जी. इंडिया लि. यांना पुर्वीच्या झालेल्या करारनाम्यास अधिन राहुन ई निविदा नोटीस क्रमांक ०१/२०१३-२०१४ ची संपुर्ण कार्यवाही होवुन नविन निविदाधारकास कामाचा आदेश देईपर्यंत मुदतवाढ देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी २ महिन्यांसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३६८५ | विषय क्रमांक – ५
दिनांक – १६/७/२०१३ | विभाग – स्थापत्य
सुचक – मा.चंद्रकांत वाळके | अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/१क/कावि/१७०/२०१३दि.३/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.२४/२०१२-१३ मधील अ.क्र.५ अन्वये, मुंबई पुणे रस्ता दापोडी ते निगडी Dedicated BRTS Lane करणेकामी मे.एच.सी.कटारीया (नि.र.रु.६,०२,१०,६४२ (अक्षरी र.रु.सहा कोटी दोन लाख दहा हजार सहाशे बेचाळीस) पेक्षा ७.०५ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु. ५,८७,६४,०८१/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

-----------------

ठराव क्रमांक – ३६८६ | विषय क्रमांक – ६
दिनांक – १६/७/२०१३ | विभाग – स्थापत्य
सुचक – मा.सुनिता वाघेरे | अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/१८७/२०१३दि.३/७/२०१३.

विषय – प्रभाग क्र.९८ मधील रस्ते खडीकरण व बी.बी.एम पध्दतीने डांबरीकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ६ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------------

ठराव क्रमांक – ३६८७ | विषय क्रमांक – ७
दिनांक – १६/७/२०१३ | विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक – मा.गणेश लोंढे | अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/२/कावि/२०२/२०१३दि.२/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महानगरपालिका क्षेत्रात येणा-या पावसाळ्यात हिवताप, डेंग्यु, चिकुनगुन्या, मलेरिया यासारखे रोग पसरू नयेत. म्हणुन वेळीच खबरदारी घेणे गरजेचे आहे. याकरिता महानगरपालिकेच्या दवाखाना/रूग्णालय तसेच म.न.पा.चे नगरसदस्य यांचे कार्यालयासमोर, अ, ब, क, ड प्रभाग, उद्यान विभाग, करसंकलन विभाग इ. ठिकाणी नागरिकांच्या सहज दृष्टीस यावीत. याकरिता फ्लेक्सची आवश्यकता असल्याने मा.सहा.आयुक्त भांडार यांचेकडील निविदा नोटीस क्र.३२/२०१२-१३ अन्वये मे.कापसे एन्टरप्रायजेस, पिंपरी वाघेरे यांचेकडील दर र.रू.११.५० प्रती चौ. असा आहे. त्यानुसार सदरचे मे. कापसे एन्टरप्रायजेस यांचेकडुन र.रू. ११.५० प्रति चौ. फुट या दराने एकुण ३५० नग (५,२५० चौ.फुट) फ्लेक्स खरेदी करणेकामी एकुण र.रू.६०,३७५/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च शासकिय योजनांची अंमलबजावणी या लेखाशिर्षातुन खर्ची टाकणे शक्य असल्याने फ्लेक्स खरेदीकामी येणा-या प्रत्यक्ष र.रू.६०,३७५/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ३६८८ विषय क्रमांक – ८
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – सुरक्षा
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.सुवि/२/कावि/१२४९/२०१३दि.२/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महानगरपालिकेच्या मिळकतींची सुरक्षा व्यवस्थेसाठी मुख्य प्रशासकिय इमारत प्रवेश व्दारा जवळ १ व मनपाचे वाय.सी.एम.एच.मधील प्रवेश व्दारा जवळ १ अशा एकुण २ एक्सरे बॅगेज इन्सपेक्शन सिस्टिम मशिन खरेदी करणे आवश्यक आहे.प्रस्तुत मशिनचे खरेदीसाठी अंदाजे एकुण र.रु. २६,०६,०००/- (अक्षरी रुपये सव्वीस लाख सहा हजार फक्त) इतक्या रकमेची आवश्यकता आहे.सुरक्षा विभागामार्फत सन २०१३-१४ च्या मुळ अंदाज पत्रकात सुरक्षा उपकरण खेरदी व दुरूस्ती या लेखाशिर्षावर र.रु.१०,००,०००/-(अक्षरी र.रु दहा लाख फक्त) इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.प्रस्तुतची तरतुद उपरोक्त दोन मशिन खरेदी करणे कामी कमी पडत आहे व प्रस्तुतची मशिनची खरेदी सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक आहे.त्यासाठी सुरक्षा विभागाच्या स्थायी अस्थापना या लेखाशिर्षावर करणेत आलेल्या र.रु. १३,९०,०००००/- (अक्षरी:- तेरा कोटी नव्वद लाख फक्त) तरतुदी मधुन प्रस्तुतचे दोन मशिन खरेदी करणेसाठी र.रु.२०,००,०००/- (अक्षरी र.रु. वीस लाख फक्त) सुरक्षा उपकरण खरेदी दुरूस्ती या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६८९ विषय क्रमांक – ९
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – जलनि:सारण
सुचक – मा.जगदीश शेट्टी अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.जनि/२/कावि/५६२/२०१३दि.२९/६/२०१३.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.५/१८/२०१२-१३ मधील अ.क्र.१५ अन्वये, पिंपरी मेन व भाटनगर पंपिंग स्टेशन्सची स्थापत्य विषयक दुरुस्ती व अनुषंगिक कामे करणेकामी मे.छोटेलाल चौहान (नि.र.रू.९,३४,९७५/- (र.रू.नऊ लाख चौतीस हजार नऊशे पंच्याहत्तर) पेक्षा २६.१० % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करून घेणेत आला असल्याने अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६९० विषय क्रमांक – १०
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – जलनि:सारण
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र.जनि/२/कावि/५६०/२०१३दि.२९/६/२०१३.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.५/१८/२०१२-१३ मधील अ.क्र.१४ अन्वये, केशवनगर, देऊळमाळा, काकडेपार्क, गोखलेपार्क इ.पंपिंग स्टेशन्सची किरकोळ दुरुस्ती करणेकामी मे.एच. एम.कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.९,४५,१३१/- (र.रू.नऊ लाख पंचेचाळीस हजार एकशे एकतीस)

पेक्षा १४.८५ % जादा) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करून घेणेत आला असल्याने अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६९१ विषय क्रमांक – ११

दिनांक – १६/७/२०१३ विभाग – जलनि:सारण

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा. सह शहर अभियंता यांचे जा.क्र.जनि/२/कावि/५५९/२०१३दि.२९/६/२०१३.

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.२/२७/२०१२-१३ मधील अ.क्र.२३ अन्वये, आकुर्डी येथील कुकी नाल्यामधुन मुख्य जलनिःसारण नलिका टाकणे (आकुर्डी ए.पी.पी.पासुन निगडी पर्यंत) कामी मे.एम.जी.माने (नि.र.रू.१८,६७,४१२/- (र.रू.अठरा लाख सदुसष्ट हजार चारशे बारा) पेक्षा २३.९० % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करून घेणेत आला असल्याने अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६९२ विषय क्रमांक – १२

दिनांक – १६/७/२०१३ विभाग – जलनि:सारण

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.गणेश लोंढे

संदर्भ:- मा.सह शहर अभियंता यांचे जा.क्र. जनि/२/कावि/५६१/२०१३दि.२९/६/२०१३.

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.५/१८/२०१२-१३ मधील अ.क्र.५ अन्वये, भाटनगर मैलाशुध्दीकरण कैंद्रा अंतर्गत भाटनगर मध्ये भुयारी गटर नलिका टाकणे (नि.क्र.५/५-१२/१३) कामी मे.गणेश कन्स्ट्रक्शन (नि.र.रू.९,३९,६८९/- (र.रू.नऊ लाख एकोणचाळीस हजार सहाशे एकोणनव्वद) पेक्षा ३३.३० % कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करून घेणेत आला असल्याने अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६९३ विषय क्रमांक – १३

दिनांक – १६/७/२०१३ विभाग – जनतासंपर्क व स्वागतकक्ष

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जसं/५/कावि/४०४/२०१३दि.४/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त दि. २५ जून ते २६ जून २०१३ या कालावधीत प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड या ठिकाणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत आयोजित कार्यक्रमांमधील व्याख्याते/कलाकरांचे मानधन, फ्लेक्स बॅनर, स्मृतिचिन्ह, मानपत्र, प्रेक्षागृह भाडे आणि मान्यवर निवास, चहापान व भोजन व्यवस्था इ. करीता थेट पध्दतीने अंदाजे र.रु.४,०८,०००/- (अक्षरी र.रु.चार लाख आठ हजार फक्त) इतका खर्च अपेक्षित असल्याने या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ३६९४ विषय क्रमांक – १४

दिनांक – १६/७/२०१३ विभाग – विद्युत मुख्य

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.जगदीश शेट्टी

संदर्भ:- मा. सह शहर अभियंता यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/३८४/२०१३दि.४/७/२०१३.

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१८/१२-१३ मधील अ.क्र.५ अन्वये, विविध अग्निशमन केंद्र येथे वायरलेस यंत्रणा उभारणेकामी मे.प्रथमेश एन्टरप्रायजेस (नि.र.रू.९,४९,०९०/- (र.रू.नऊ लाख एकोणपन्नास हजार नव्वद) पेक्षा २.२० **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६९५ विषय क्रमांक – १५

दिनांक – १६/७/२०१३ विभाग – विद्युत मुख्य

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- मा. सह शहर अभियंता यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/३८५/२०१३दि.४/७/२०१३.

मा. सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१८/१२-१३ मधील अ.क्र.६ अन्वये, पाणीपुरवठा विभागाकरिता वायरलेस यंत्रणा उभारणेकामी मे.प्रथमेश एन्टरप्रायजेस (नि.र.रू.९,४९,०९०/- (र.रू.नऊ लाख एकोणपन्नास हजार नव्वद) पेक्षा २.४० **%** कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६९६ विषय क्रमांक – १६

दिनांक – १६/७/२०१३ विभाग – झो.नि.पु स्थापत्य

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.सदगुरु कदम

संदर्भ:- मा.कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.झो.नि.पु/स्था/जा/कावि/२३५/२०१३दि.१/६/२०१३.

मा. कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील निविदा नोटीस क्र.१/४-२०१२-१३ पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी रात्र निवारे सुरु करणे कामी संचलन व देखभालीची कामे करणे यास मान्यता मिळालेली आहे. सदर कामास ठराव क्र.२८९२ दि.२२/२/२०१३ अन्वये मान्यता मिळालेली असुन सदर ठरावामध्ये विषयांकित कामास निविदा अटीप्रमाणे नगरसचिव यांचेकडे पत्र क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/१५४/२०१३ दि.११/२/२०१३ अन्वये विषयपत्रामधील मजकुरातील डांबर, सिमेंट, लोंखड या तिन्ही मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील हा भाग नजरचुकीने आलेला नाही. तरी वरील प्रमाणे सदर ठराव दुरुस्त करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६९७ विषय क्रमांक – १७
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.गणेश लोंढे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.सक्षम प्राधिकारी तथा सह आयुक्त यांचे जा.क्र.झोनिपु/स्था/नि/कावि/६७७/२०१३ दि.०४/७/२०१३.

मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या झो.नि.पू.स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१२-१३ मधील अ.क्र.४३ अन्वये, प्रभाग क्र.६२ मधील झोपडपट्टीमध्ये स्ट्रॉम वॉटर व्यवस्था करणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.बरखा एन्टरप्रायजेस (नि.र.रू.९,२५,८१८/- [र.रू.नऊ लाख पंचवीस हजार आठशे अठरा] पेक्षा १०.९९ **%** कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू.८,२४,०७१/- पर्यंत काम करून घेण्यास बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर कामाचा करारनामा करून घेणेत आला असून, एजन्सीस कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६९८ विषय क्रमांक – १८
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – क्रीडा
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- १)मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. क्रीडा/६/कावि/६४०/२०१३दि.१/६/२०१३.
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ३/७/२०१३ ठराव क्र.४ नुसार

राष्ट्रीय ग्रामिण विकास केंद्र पुणे यांनी मागणी केल्याप्रमाणे इंद्रायणीनगर भोसरी बॅडमिंटन हॉल दि. १/४/२०१३ ते दि.२८/२/२०१४ पर्यंत ११ महिने कराराने गतवर्षीच्या दरमहा भाडे रक्कम रुपये ७,४०७/- मध्ये १०% भाडेवाढ करुन (र.रु.७४१/-) करुन दरमहा भाडे रक्कम रुपये ८१४८/- फक्त प्रमाणे चालविणेस देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३६९९ विषय क्रमांक – १९
दिनांक – १६/७/२०१३
सुचक – मा.जगदीश शेट्टी अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- १) मा.मंदाकिनी ठाकरे,मा.भारती फरांदे यांचा प्रस्ताव..
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ३/७/२०१३ ठराव क्र.५ नुसार,

पिंपरी चिंचवड मनपाच्या वतीने पिंपरीचिंचवड हँडबॉल असो. यांचे सहकार्याने व पुणे जिल्हा हँडबॉल असो. यांच्या मान्यतेने महापौर चषक जिल्हा स्तर हँडबॉल स्पर्धा २०१३ – १४ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु. ३,७७,०००/- ( अक्षरी र.रु. तीन लाख सत्याहत्तर हजार फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७०० विषय क्रमांक – २०

दिनांक – १६/७/२०१३

सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे

संदर्भ:- १) मा.भारती फरांदे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

२)मा.क्रिडा समिती सभा दिनांक ३/७/२०१३ ठराव क्र.६ नुसार,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा विभागांतर्गत खेळाडु दत्तक योजना राबविण्यात येत आहे. खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना मनपा राबवित असुन या योजनेचे दि.१८/०४/२०१३ रोजी उदघाटन करण्यात आलेले आहे. सध्या सदर खेळाडुंना र.रु. ५०/- दैनिक आहारभत्ता मंजुर करण्यात आलेला आहे. तथापि हा आहारभत्ता खेळाडुंना प्रोत्साहन देण्यासाठी व त्याच्या दैनंदिन क्रीडा विषयक नैपुण्य जोपासण्यासाठी अत्यंत अपुरा पडत असल्याचे व त्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय महापालिकेने घ्यावा, असे अनेक राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडु व क्रीडा संघटनांनी त्यांचे निदर्शनास आणुन दिले आहे. त्यांची भावना अत्यंत रास्त असुन या खेळाडुंना प्रोत्साहनासाठी र.रु. ५०/- ऐवजी र.रु. २००/- प्रतिदिन असा खेळाडु आहारभत्ता मंजुर करणे आवश्यक असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या खेळाडु दत्तक योजने अंतर्गत दि. २२/४/२०१३ पासुन राबविणेत येत असलेल्या खेळाडु दत्तक योजनेतील विद्यार्थी खेळाडुंना दि.२२/४/२०१३ पासुन प्रतिदिन आहारभत्ता र.रु.५०/- ऐवजी र.रु. २००/- असा मंजुर करणेस मान्यता देणेत येत आहे. व याकामी आवश्यक ती तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सदरचा विषय दरवर्षी मान्यतेकामी मा.स्थायी समितीपुढे सादर करण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------------

ठराव क्रमांक – ३७०१ विषय क्रमांक – २१

दिनांक – १६/७/२०१३

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे

संदर्भ:- १)मा.प्रभाकर वाघेरे,मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव..

२)मा.क्रिडा समिती सभा दिनांक ३/७/२०१३ ठराव क्र.११ नुसार,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व नवप्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर, चिंचवड पुणे ३३ यांचे सहकार्याने दिनांक २९ ते ३१ जुलै २०१३ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळात गणेश महल भोईर नगर चिंचवड पुणे ३३ महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा २०१३ चे आयोजित करण्यात येत आहे तरीपिंपरीचिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पुणे जिल्हा कॅरम असोसिएशन यांच्या मान्यतेने व नवप्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर,चिंचवड पुणे ३३ यांचे सहकार्याने दिनांक २९ ते ३१ जुलै २०१३ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत महापौर चषक जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धा आयोजित करणेस व त्या कामी येणा-या र.रु. २,००,०००/- च्या खर्चास मान्यता घेणे व कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन, प्राप्त झालेल्या मंजुर दरानुसार ट्रॉफिज, स्मृतीचिन्हे, चहा व अल्पोपहार व्यवस्था, पी.व्ही.सी. फ्लेक्स बॅनर्स तयार करुन घेणेस व भांडार विभागाकडील निविदा मंजुर दरानुसार निमंत्रणपत्रीका, सर्टिफिकेट्स खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------------

ठराव क्रमांक – ३७०२ विषय क्रमांक – २२
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – प्रशासन
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/२/कावि/१५७२/२०१३दि.८/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

समाजसेवक पदासाठी घेणेत येणा-या लेखी स्पर्धा परीक्षेकरिता मे.झील टेक् सर्व्हीसेस, कोथरुड, पुणे यांचेकडून ओएमआर उत्तरपत्रिका छपाई करुन घेणेस तसेच मशीनवर उत्तरपत्रिका तपासणीचे काम थेट पध्दतीने करुन घेणेस व त्याकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. (अंदाजे खर्च र.रू.५,५४०/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७०३ विषय क्रमांक – २३
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – माध्यमिक शिक्षण
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.माध्य/शि/३/कावि/१६७/२०१३दि.८/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २०१३ पासून ज्यावर्षी १८ माध्यमिक विद्यालयातील एकही विद्यार्थी उपरोक्त ९१% व त्यापुढील जास्त गुणांच्या टक्केवारीमध्ये प्राप्त झाला नाही तर १८ माध्यमिक विद्यालयातून जो विद्यार्थी प्रथम येईल अशा विद्यार्थ्यास प्रोत्साहनपर म्हणून र.रु.१,००,०००/- रोख स्वरुपात (धनादेशाद्वारे) अदा करणे, व सन २०१३ मध्ये झालेल्या परीक्षेमध्ये ८०% पेक्षा जास्त गुण मिळालेल्या ६५ विद्यार्थी / विद्यार्थीनी यांना द्यावयाचे रक्कम रुपये १९,००,०००/- चे खर्चास व कार्यक्रम आयोजनासाठी येणारा अपेक्षित खर्च र.रु.४०,०००/- (अक्षरी र.रु चाळीस हजार फक्त) खर्चास थेट पद्धतीने खुल्या बाजारातुन करारनामा न करता करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७०४ विषय क्रमांक – २४
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – संगणक
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.महेशदादा लांडगे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/८/कावि/१४५/२०१३दि.८/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

Customized Premium (Advance) Server Management चे कामकाज करारनामा न करता प्राप्त कोटेशन दराप्रमाणे दरमहा र.रु.८,९८९/- प्रमाणे १० महिने कालावधीसाठी मे.बालासाई नेट प्रा. लि. यांचेकडून करुन घेणेस व त्याकरिता येणा-या र.रु.८९,८९०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७०५ विषय क्रमांक – २५
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – वैद्यकिय
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/१अ/कावि/६५२/२०१३दि.८/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

डॉ.रण्णा दणप्पा एम.डी.(गायनॅक) यांना प्रतिमहा र.रू.१,०००/- एकत्रित मानधनावर आदेशाचे दिनांकापासून ६ महिने कालावधीसाठी यमुनानगर रूग्णालयात नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७०६ विषय क्रमांक – २६
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.गणेश लोंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/लेखा/८/कावि/१४८/२०१३दि.६/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

१)JnNURM प्रकल्पा अंतर्गत BSUP & IHSDP प्रकल्पाबाबत Central Sanctioning & Monitoring Committee (CSMC & CSC) नवी दिल्ली यांनी दिनांक १२/४/२०१३ रोजी तातडीने आयोजित केलेल्या बैठकीस सहशहर अभियंता श्री.राजन पाटील हे स्वखर्चाने विमान प्रवास करुन उपस्थित राहीले होते. सदर तातडीच्या विमानप्रवासाचा खर्च र.रु.२१,६५६/-ची प्रतिपुर्ती श्री.राजन पाटील यांना करुन देणे आवश्यक आहे. **२)**तसेच सह शहर अभियंता श्री.राजन पाटील यांची पीजीडीयुएम या यशदा पुणे यांचेकडील कोर्स साठी निवड झाली होती. यशदा पुणे यांनी पीजीडीयुएम कोर्स अंतर्गत चेन्नई व केरळ अभ्यासदौरा फेब्रुवारी २०१३ मध्ये आयोजित केला होता. सदर अभ्यासक्रमास उपस्थित रहाण्यासाठी सहशहर अभियंता यांचेकडील मोठ्या प्रमाणातील कामकाज व कामाच्या तातडीमुळे रेल्वेने प्रवास करणे शक्य न झाल्याने त्यांना पुणे–चेन्नई, चेन्नई-कोची, व कोची–पुणे असा स्वखर्चाने विमान प्रवास करणे भाग पडले आहे. सदर विमानप्रवासाचा खर्च र.रु.१७,९७६/-ची प्रतिपुर्ती श्री राजन पाटील यांना करुन देणे आवश्यक असल्याने उपरोक्त दोन्ही प्रकरणी श्री.राजन पाटील सहशहर अभियंता यांनी विमानप्रवासासाठी केलेला खर्च र.रु.२१,६५६/- अधिक र.रु.१७,९७६/- असे एकुण र.रु.३९,६३२/-ची प्रतिपुर्ती श्री.राजन पाटील सहशहर अभियंता यांना करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७०७ विषय क्रमांक – २७
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/८/कावि/३०६/२०१३दि.९/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ७३ शेड्युल चॅप्टर ५(२) नुसार निविदा न मागविता करारनामा न करता तातडीची बाब म्हणुन मनपाचे वाहन दुरुस्ती कार्यशाळा विभागाकरिता आवश्यक वेगवेगळ्या प्रकारचे ऑईल व ग्रिस मे.हिन्दुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. पुणे या उत्पादीत कंपनीकडुन उपलब्ध तरतुद र.रु १८,००,०००/- मधुन आवश्यकतेनुसार पहिल्या टप्यातील ऑईल व ग्रिस थेट खरेदी करणेस व येणा-या खर्चास एकुण रु.रु १०,९५,५९१/-चे खर्चास मान्यता घेणेकामी व सदरची रक्कम मे.हिन्दुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि. पुणे यांना आगाऊ स्वरुपात अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------------

ठराव क्रमांक – ३७०८ विषय क्रमांक – २८
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/०४/कावि/६२९/२०१३दि.८/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपास सन २०१२-१३ करिता विविध लेखन/स्टेशनरी साहित्य खरेदीबाबत ई निविदा सुचना क्र.३३/२-२०१२-१३ अन्वये प्राप्त लघुत्तम निविदाकार **१)** मे.श्री साई उद्योग यांचे ०७ बाबी विविध स्टेशनरी साहित्याचे दर एकुण र.रु. १,८४,७५०/-, **२)** मे. कॉम्प्युटॅक्स फॉर्म्स प्रा. लि. यांचे ०२ बाबी विविध स्टेशनरी साहित्याचे दर एकुण र.रु. १७,५५०/-, **३)** मे. भारती एंटरप्रायजेस यांचे ०६ बाबी विविध स्टेशनरी साहित्याचे दर एकुण र.रु. ७७,४३०/-, **४)** मे. सुरज कॉपीअर्स अँड स्टेशनरीज यांचे ०१ बाबी विविध स्टेशनरी साहित्याचे दर एकुण र.रु.३०,६००/-, **५)** मे. श्री ट्रेडर्स यांचे ०४ बाबी विविध स्टेशनरी साहित्याचे दर एकुण र.रु. ५९,३००/-, **६)** मे. साई श्रध्दा एंटरप्रायजेस यांचे ०३ बाबी विविध स्टेशनरी साहित्याचे दर एकुण र.रु. ६६,१५०/-, **७)** मे. कापसे एंटरप्रायजेस यांचे ०२ बाबी विविध स्टेशनरी साहित्याचे दर एकुण र.रु. ८९,५००/- **८)** मे. इंदु इन्फोटेक सोलुशन्स यांचे ०३ बाबी विविध स्टेशनरी साहित्याचे दर एकुण र.रु. १,६५,०००/- व **९.** मे.डी.के.दोडके एंटरप्रायजेस यांचे ०३ बाबी विविध स्टेशनरी साहित्याचे दर एकुण र.रु. १,६५,०२८/- प्रमाणे एकुण ३८ बाबींसाठीचे एकुण र.रु. ८,५५,३०८/- दर स्विकृती करुन खरेदीकामी करारनामा करणेत आलेला असुन, पुरवठा आदेश निर्गत करणेत आलेले असल्याने प्रस्तुतकामी केलेल्या संविदेची माहिती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७३ (ड) नुसार अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------------

ठराव क्रमांक – ३७०९ विषय क्रमांक – २९
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – ई-गव्हर्नन्स
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.संगणक/२/कावि/५५३/२०१३दि.८/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मे.मोनार्च टेक्नॉलॉजीस् प्रा.लि.पुणे यांना सन २०१३-१४ या कालावधीत महापालिकेची संगणक यंत्रणा देखभाल व दुरुस्तीचे काम एक वर्ष कालावधीसाठी देण्यास तसेच त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या रक्कम रुपये ४१,५५,९९९/- चे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम ७३ (क) नुसार मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७१० विषय क्रमांक – ३०
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – विद्युत मुख्य
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भः-मा.सह शहरअभियंता (वि/यां)यांचे जा.क्र.वि/मुका/४/कावि/३९५/२०१३दि.१०/७/२०१३.

मा. सह शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१७/२०१२-१३ मधील अ.क्र.७ अन्वये, पिं.चिं.मनपाच्या अ व क प्रभागातील विविध पंपींग स्टेशन मधील नादुरुस्त नॉन रिर्टन वॉल्व व स्ल्युस वॉल्वची देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.शैलराज एन्टरप्रायजेस (नि.र.रू.२४,५०,८२२/- र.रू.चोविस लाख पन्नास हजार आठशे बावीस) पेक्षा १९.०० % कमी) या ठेकेदाराकडून वरील कामाचा करारनामा करुन घेणेत आलेला असून कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७११ विषय क्रमांक – ३१
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – ई गव्हर्नस
सुचक – मा.महेशदादा लांडगे अनुमोदक – मा.जगदीश शेट्टी
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.ई गव्हर्नस/२/कावि/५५५/२०१३दि.०९/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.राजेश भुसारी, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी, (NIC) यांना महापालिकेत नागरी सुविधा केंद्र सल्लागार म्हणून दिनांक १ ऑगष्ट २०१३ पासून सहा महिने कालावधीसाठी नेमणूक करणेस व त्यांचे प्रवासखर्च, निवास खर्च यासाठी प्रत्यक्ष येणाऱ्या सर्व खर्चास व सदरचा खर्चई-गव्हर्नस विभागाकडील ई-गव्हर्नस लेखाशिर्षावरुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७१२ विषय क्रमांक – ३२
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – मध्यवर्ती साहित्य भांडार
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/५/कावि/४३७/२०१३दि.८/७/२०१३.
विषय :- वाय.सी.एम.रुग्णालयातील डक्ट व ड्रेनेज साफसफाई करणेबाबत..

विषय क्रमांक ३२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------------

ठराव क्रमांक – ३७१३ विषय क्रमांक – ३३
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – स्थानिक संस्था कर
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्थासंक/१०ब/कावि/१९८/२०१३दि.१०/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

स्थानिक संस्था कराची नोंदणी ही मनपाच्या आर्थिक हिताची असल्यामुळे ज्या व्यावसायिकांनी अद्यापि नोंदणी केली नाही त्यांनी स्थानिक संस्था कराची नोंदणी करावी यासाठी त्यांना पत्र देणे आवश्यक आहे पत्र पाठविण्याकरीता एकूण ५०००० विंडो पाकिटांची खरेदी तातडीची गरज, कालमर्यादा लक्षात घेऊन निवीदा न मागविता, करारनामा न करता मे.कापसे एंटरप्राईजेस, पिंपरी यांचेकडून केलेली असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.(खर्च र.रू.४०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------------

ठराव क्रमांक – ३७१४ विषय क्रमांक – ३४
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – लेखा
सुचक – मा.जगदीश शेट्टी अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/३/कावि/४५८/२०१३दि.११/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपा सेवक, अंधव्यक्ती, दैनिक व साप्ताहिक वर्तमानपत्रातील वार्ताहार, विद्यार्थी पासेस, स्वातंत्र्य सैनिक, जेष्ठ नागरिक, मतिमंद व्यक्ती यांना सवलतीचे पासेस दिलेले आहेत. पासेसची संख्या व रकमेबाबत पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे तपासणी करुन खात्री केली जाईल व त्यानुसार सदर रकमेची अदायगी करणेत येईल. सन १३-१४ च्या मंजुर अंदाजपत्रकात वाहन व्यवहार निधी रक्कम रु.३८ कोटी तरतूद केलेली आहे. त्यापैकी पुणे महानगरपरिवहन विभागास र.रु.१,८५,२४,४६२/- अदा केली असून र.रु.३६,१४,७५,५३८/- शिल्लक आहेत. सदर पासेसचा खर्च र.रु.२४,८५,३३,९२८/- मान्यतेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.</u>

ठराव क्रमांक – ३७१५ विषय क्रमांक – ३५
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – दुरसंचार
सुचक – मा.सदगुरु कदम अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दुरसंचार/४/कावि/१७७/२०१३दि.१६/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे दुरसंचार विभागाचे नियंत्रणाखालील "हेल्पलाईन" नुतनीकरणाचे काम चालु असुन त्याचे चालनाकरीता सहा "कॉलसेंटर ऑपरेटर" थेट पध्दतीने सहा महिन्यांचे करारावर एकत्रीत मानधन र.रु. १०,०००/- प्रतीमाह प्रमाणे घेणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच भविष्यात सदर हेल्पलाईन चालकांचे संख्येत आवश्यकतेप्रमाणे वाढ करणेस व होणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच सदर कॉल सेंटरसाठी एक आकर्षक गोल्ड/कॅची मोबाईल नंबर मे.आयडीया सेल्युलर लि. यांचेकडुन अंदाजे र.रु.५०,०००/- एवढया रकमेस घेणेस व त्यासाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७१६ विषय क्रमांक – ३६
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – दुरसंचार
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.दुरसंचार/४/कावि/१७६/२०१३दि.१६/७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे हेल्पलाईन नुतनीकरणाचे काम चालु असुन त्यासाठी लागणारे कॉलसेंटर ऑपरेटर थेट पध्दतीने सहा महिन्यांचे करारावर घेणेकरीता तातडीने वृत्तपत्रात जाहीरात देणेत आली आहे. सदर जाहीरात खालील वृत्तपत्रात १० से.मी. X १२ से.मी. (१२० स्क्वेअर से.मी.) या आकाराच्या जागेसाठी प्रसिध्दी देणेकामी खालील प्रमाणे खर्च आला आहे.

| क्र | दैनिकाचे नाव | दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | दै.सकाळ(मराठी) पिंपरी चिंचवड टुडे | र.रु.२२५/- प्रती sq.cms | र.रु.२७०००/- |
| २ | DNA (इंग्रजी) | र.रु.२५०/-प्रती sq.cms | र.रु.३०,०००/- |
| ३ | दै.लोकमत | र.रु.३६/- प्रती sq.cms | र.रु.४,३२०/- |
| | | एकुण खर्च | र.रु.६१,३२०/- |

सबब सदर जाहीरात वृत्तपत्रात प्रसिध्द करणेकामी आलेल्या र.रु. ६१,३२०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७१७ विषय क्रमांक – ३७
दिनांक – १६/७/२०१३ विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.म.औ.भां/१/कावि/१३९/२०१३ दि.१२/७/२०१३.
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे..

वाय.सी.एम.रुग्णालयामध्ये सर्पदंशाचे येणा-या रुग्णांची संख्या लक्षात घेता Inj.ASV (10ml) = 500 (Vials) ची आवश्यकता असुन मे.हाफकिन बायो फार्मा कार्पोरेशन लि. मुंबई यांचेकडुन रक्कम रुपये ६८७.७८ प्रति व्हायल या सुधारित दराने खरेदीकामी रक्कम रुपये ३,४३,८९०/- आगाऊ रक्कम अदा करणेस व तसेच सन २०१३-१४ या कालावधीसाठी वेळोवेळी आवश्यकतेनुसार Inj.ASV (10ml) मे. हाफकिन बायो फार्मा कार्पोरेशन लि. मुंबई यांचेकडुन रक्कम रुपये ६८७.७८ प्रति व्हायल या सुधारित दराने आगाऊ रक्कम अदा करुन खरेदी करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७१८ विषय क्रमांक – ३८
दिनांक – १६/७/२०१३
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.अरुणा भालेकर,मा.अविनाश टेकावडे यांचा प्रस्ताव..

नि.नो.क्र.१२/४-२००७-२००८ या कामास मा.स्थायी समिती ठराव क्र.२५८० दि. २१/११/२००७ (रक्कम रुपये २,१०,०१,७२१/-) व ठराव क्र.३६६७ दि.२२/०१/२००८ (रक्कम रुपये ९,९८,४६,४९२/-) अन्वये निविदा दरास अटी-शर्तीसह करारनामा करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरच्या कामाची आवश्यकता लक्षात घेता सदरच्या कामास व खर्चास पुर्व स्वीकृत दराने, निविदा अटी शर्ती व निविदा पुर्व सभेनुसार भाववाढीस अंदाजे (र.रु.७५,००,०००/-) अक्षरी पंच्याहत्तर लाख रुपयास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

ठराव क्रमांक – ३७१९

दिनांक – १६/७/२०१३

सुचक – मा.अरुणा भालेकर

विषय क्रमांक – ३९

विभाग – मध्यवर्ती भांडार

अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/०४/कावि/६४१/२०१३ दि.१६/०७/२०१३

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

१० कलमी कार्यक्रमांतर्गत फोर कलर पुस्तिका छपाई १५०० प्रती र.रु.२१५/- प्रती नग याप्रमाणे छपाई मे.सृजन कम्युनिकेशन, नांदेड यांचेकडुन करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु. ३,२२,५००/- चे खर्चास व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------------

यानंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/६७०/२०१३
दिनांक - १८/०७/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.